बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क साधा
✻ संपर्क ✻
मो. 9421505122

साप्ताहिक
# मनमाड थिणगी

https://manmadthinagi.com/news

संस्थापक संपादक : स्व.प्रकाशजी गोयल    संपादक : तुषार गोयल

RNI Regd.No.91032/90 (Delhi) | वर्ष ३३ वे | अंक ८ वा. | वार : रविवार दि.१३ नोव्हेंबर २०२२ | पाने ६ | किमत ५ रू.



22k 916
हॉलमार्क सर्टीफाईड बिनघटीचे दागिने शुध्दता आणि विश्वास
100% BIS Approved Hallmarked Jewellery
कंचन ज्वेलर्स
सराफ बाजार, मनमाड
तुषार गोयल ९४२१५०५१२२
दिपक गोयल ९९६०९३१४१४




## स्वातंत्र्यसेनानी कॉ. माधवराव गायकवाड ध्येयनिष्ठ विचारांची धगधगती मशाल होती - भास्कर कदम



नांदगाव : स्वातंत्र्यसेनानी, कष्टकरी खंडकरी शेतकऱ्यांचे लढवय्ये नेते कॉ.माधवराव गायकवाड महाराष्ट्राची बुलंद तोफ तशीच ध्येयनिष्ठ विचारांची धगधगती मशाल होती, असे प्रतिपादन नांदगावचे माजी नगराध्यक्ष भास्कर कदम यांनी त्यांच्या चतुर्थ स्मृती दिनानिमित्त केले. नांदगाव येथील माणिक संकुलात छत्रपती पतसंस्थेच्यावतीने समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज तसेच कॉ.माधवराव गायकवाड यांचे प्रतिमेचे पूजन केले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी भास्कर कदम होते. कॉ.माधवराव यांनी स्वातंत्र्य लढा, गोवामुक्ती आंदोलन याचबरोबर कष्टकरी कामगार, खंडकरी शेतकरी, शेतमजुर यांच्यासाठी आपले आयुष्य खर्ची घातले. ते आयुष्यभर भारतीय कम्युनिष्ठ पक्षाशी एकनिष्ठ राहिले. आजच्या राजकीय कोलांटउड्या लक्षात घेता त्यांची पक्षनिष्ठा दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरते, असेही कदम यांनी आपल्या भाषणात नमूद केले. याप्रसंगी पतसंस्थेचे व्यवस्थापक देविदास नंद, माजी नगरसेवक प्रकाश थोरात, राजेंद्र पाटील (व्यवस्थापक नामको बँक नांदगाव), साईनाथ पवार, धनराज अग्रवाल, सुमेर कासलीवाल, संतोष पारख, भगवान गांगुर्डे, मुन्ना कलंत्री, नाना पगार, शालिनी पगारे, सुनिता जैन, मजहर खान, भरत कासलीवाल यांचेसह अल्पबचत प्रतिनिधी व कर्मचारी वर्ग इत्यादी उपस्थित होते.

## राष्ट्रवादी कॉंग्रेस तर्फे गुरुनानक जयंती निमित्त शुभेच्छा !



मनमाड : शीख धर्माचे पहिले गुरू गुरूनानक देवजी यांच्या ५५३ व्या जयंती निमित्त मनमाड शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस तर्फे मनमाड येथील गुरूद्वारा येथे भेट देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. कोरोना व महापुरात गुरूद्वारा तर्फे देण्यात आलेल्या सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारी एक प्रतिमा यावेळी मनमाड गुरूद्वारा गुप्तसर साहेबचे संत बाबा रणजितसिंग यांना राष्ट्रवादी कॉंग्रेस मनमाड शहराच्या वतीने भेट देण्यात आली. यावेळी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दीपक गोगड, सेवादलचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र जाधव, अल्प.तालुकाध्यक्ष हबीब शेख, अमोल गांगुर्डे, मनोज परदेशी, श्रीराज कातकाडे, अक्षय देशमुख, अमोल काळे, संदीप जगताप, प्रतिक मोरे, आनंद बोथरा आदी उपस्थित होते.

## नाजीम शेख यांच्या उपोषणास राष्ट्रवादीचा पाठींबा




मनमाड : मनमाड शहरातील विविध समस्या त्वरित सोडविण्यात याव्यात, या मागणीसाठी कॉंग्रेसचे माजी नगरसेवक नाजीम शेख हे बेमुदत उपोषणास बसले होते. सदर उपोषणास राष्ट्रवादी कॉंग्रेस मनमाड शहराच्या वतीने लेखी पाठींबा देण्यात आला. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी उपोषण स्थळी नाजीम शेख यांची भेट घेत त्यांना जाहीर पाठिंब्याचे लेखी पत्र दिले. शहराध्यक्ष दीपक गोगड, कार्याध्यक्ष नाना शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी महिला शहराध्यक्ष अपर्णा देशमुख, अल्प.तालुकाध्यक्ष हबीब शेख, युवा जिल्हा संघटक अमोल गांगुर्डे, अक्षय देशमुख, आनंद बोथरा आदी उपस्थित होते.

## बाळासाहेबांची शिवसेना जिल्हा व तालुका कार्यकारिणी जाहीर



मनमाड : शिवसेना संपर्क कार्यालय मनमाड येथे आमदार सुहास आण्णा कांदे यांनी बाळासाहेबांची शिवसेना पक्षाची (जिल्हा व तालुका) नूतन कार्यकारिणी जाहिर केली आहे. आमदार सुहास आण्णा कांदे यांनी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे शाल श्रीफळ व पुष्प-गुच्छ देऊन सत्कार केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

नवनिर्वाचित पदाधिकारी पुढील प्रमाणे : जिल्हाप्रमुख नाशिक (ग्रा.) किरणभाऊ देवरे उपजिल्हाप्रमुख सुनीलभाऊ हांडगे, नांदगाव तालुका प्रमुख साईनाथभाऊ गिडगे, मनमाड शहरप्रमुख मयूरभाऊ बोरसे, तालुका संघटक महावीरभाऊ ललवानी, तालुका समन्वयक बाळाभाऊ सांगळे, जिल्हा युवा अधिकारी फरहान खान उपजिल्हा युवा अधिकारी नितीनभाऊ सानप, तालुका युवा अधिकारी सागर हिरे युवासेना शहर प्रमुख मनमाड योगेशभाऊ इमले (प्रभाग १ ते ७) व आसिफभाई शेख (प्रगाग ८ ते २५) युवासेना तालुका समन्वयक सिद्धार्थ राजाभाऊ छाजेड व अजिंक्यभाऊ साळी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष तालुका समन्वयक विकास (पिंटूभाऊ) वाघ, शिवसेना अपंग सेना शहराध्यक्ष विठ्ठल अण्णा नलावडे, प्रसिद्धीप्रमुख निलेश भाऊ व्यवहारे.

शिवसेना महिला आघाडी जिल्हा प्रमुख : सौ.मंगलाताई भास्कर, उपजिल्हाप्रमुख : डॉ.श्रध्दा कुलकर्णी सौ.उज्वलाताई खाडे, उपजिल्हा संघटक : सौ.कल्पना दोंदे, नांदगांव तालुका प्रमुख : विद्याताई जगताप, नांदगाव तालुका विधानसभा संघटक : सौ. पूजाताई छाजेड, मनमाड शहरप्रमुख : सौ.संगीताताई बागुल, शहर समन्वयक : सौ.नेहा जगताप सौ.लक्ष्मीताई अहिरे. मनमाड उपशहरप्रमुख : सौ. कविताताई पाटेकर, सौ.सुरेखा ढाके संघटक : सौ.निताताई लोंढे, सौ. संगीताताई घोडेराव, सौ.प्रतिभा अहिरे, सौ.राधा मोरे, सौ.वंदना शिंदे, सौ. सावित्रीबाई खुरसणे, सौ.नीतू परदेशी, सौ.भावना गंगवाने, सौ.अलका कुमावत नांदगाव शहर प्रमुख सौ.रोहिणी मोरे, शहर समन्वयक, सौ.भारती भागरे उपशहर प्रमुख तब्बसुम बानू शेख सय्यद, संघटक : सौ.पल्लवी प्रवीण सोमासे, कु. दिपाली शेळके, कु. सीमा चव्हाण, जातेगाव गट प्रमुख : सौ.शेवंताबाई राठोड, गणप्रमुख : सौ. लक्ष्मीताई राठोड, सौ.गंगाबाई चव्हाण, सौ.सुमनबाई राठोड, सौ.दाकीबाई जाधव, सौ.विमलबाई चव्हाण, न्यायडोंगरी गटप्रमुख : सौ.गीताताई राहुल पवार, साकोरे गटप्रमुख : सौ.अश्विनीताई पवार गणप्रमुख : सौ. कविताताई ताडगे, सौ.वर्षा निकम, भालूर गट प्रमुख : सौ.सुनीताताई महाले, गण प्रमुख : सौ.अर्चना सोनवणे, सौ.आशा पगारे, सौ.मनीषा महाले, सौ.उषाताई पगारे, सौ.शोभाताई गरुड, कळवाडी गटप्रमुख : सौ.सीमाताई जाधव, गणप्रमुख : सौ.मालतीताई वाघ, सौ.सोनाली सूर्यवंशी, निमगाव गट प्रमुख : सौ.मनीषाताई इंगळे, गणप्रमुख : सौ.भारतीताई ठोके सौ.दिपाली शिळ्ळक, संघटक : सौ.माया सोनवणे, सौ.सोनाली तोरे, सौ.मोहिनी लटके, सौ.वाल्हाबाई शेरमाळे, सौ.मनीषा तोरे, सौ. मीनाबाई खेमनर, सौ.सुनीता बच्छाव, सौ.राधा शिळ्ळक, सौ.आरती माने, सौ.मंगलबाई माने सौ.कमल लटके, सौ.प्रमिला धोंडगे, सौ.दिपाली धोंडगे, सौ.उषा गोंधळी, सौ.मनीषा गरूड, सौ. कल्पना धोंडगे. जिल्हा प्रमुख, तालुका प्रमुख तसेच शहर प्रमुख यांच्याशी चर्चा करून लवकरच उर्वरित पदे जाहिर करण्यात येतील असे ही याप्रसंगी जाहीर करण्यात आले. सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन तसेच पुढील वाटचालीस ठिणगी पोर्टल न्यूज तर्फे शुभेच्छा !

## मनमाड महाविद्यालयात महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या विश्वस्त संपदा दीदी हिरे यांच्या हस्ते महिला कक्षाचे उद्घाटन



मनमाड : दिनांक ७ नोव्हेंबर २०२२ रोजी महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मनमाड येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत महाविद्यालयात स्वतंत्र महिला कक्ष उभारण्यात आला. या कक्षाचे उद्घाटन महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या विश्वस्त तथा मधुरा ट्रस्टच्या अध्यक्षा व उद्योजिका संपदा दीदी हिरे यांच्या शुभहस्ते झाले. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना त्या म्हणाल्या की, महाविद्यालयात सुरू होणाऱ्या स्वतंत्र महिला कक्षाच्या माध्यमातून मुलींच्या मूलभूत सुविधा निर्माण होण्यास मदत झाली असून येणाऱ्या काळात महिला कक्षाची अनिवार्यता असेल. आजच्या धकाधकीच्या आणि धावपळीच्या जीवनात मुलींनी करिअरकडे लक्ष दिले पाहिजे. कोरोना महामारीच्या काळात सुमारे अनेक महिलांना वैधव्य आले, अनेकांनी आपले पती गमावले. अशा बिकट परिस्थितीत त्या महिला आर्थिक सक्षमतेअभावी हातबल झाल्या, त्यांना आर्थिक प्रश्नांना सामोरे जावे लागले. जर अशा परवडीच्या काळात महिला स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या असत्या तर पती निधनानंतरही त्यांनी खचून न जाता नव्या उमेदीने आपली रोजी रोटी चालवली असती. कुठेतरी धुणीभांडी करणे, झाडलोट करणे यापेक्षा महाविद्यालयातील वयापासूनच मुलींनी करिअर कडे लक्ष दिले तर भविष्यात निराधार होण्याची वेळ येणार नाही. यावेळी त्यांनी मधुरा ट्रस्टच्या माध्यमातून महिलांसाठी जे जे उपक्रम चालतात त्या त्या उपक्रमांची त्यांनी माहिती दिली. गरजू महिलांनी मधुरा ट्रस्टची संपर्क साधावा, असे आवाहनही संपदा दीदी यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरूण पाटील यांनी महिला विकास समितीच्या माध्यमातून जे उपक्रम राबविले जातात त्या उपक्रमांची माहिती दिली. महिला व मुलींचे आरोग्य, मुलींच्या स्वसंरक्षणार्थ जुदो कराटे स्पर्धांचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आल्याचे प्राचार्य पाटील यांनी सांगितले.

आज प्रत्यक्षात मुलींची गुणवत्ता मुलांपेक्षा सरस असून मनमाड महाविद्यालय देखील मुलींच्या भविष्यकालीन करिअरला सामोरे ठेवून गुणवत्तापूर्ण उपक्रम राबविणार असल्याचे सांगितले. महिला विकास कक्षाच्या अध्यक्षा कविता काखंडकी यांनी आपल्या प्रास्ताविकातून महिला विकास कक्षाच्या कामकाजाविषयी माहिती दिली व कार्यक्रमाच्या उद्घाटक व प्रमुख पाहुण्या श्रीमती संपदा दीदी हिरे यांचा परिचय करून दिला. याप्रसंगी व्यासपीठावर वुमन्स वेल्फेअरच्या सदस्या व चीफ ऑफिसर ऑफ अर्केडमी अँड एक्झाम सेक्शन च्या श्रीमती दिप्ती भुतडा, स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्या श्रीमती अलका ताई शिंदे, वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ.प्रमोद आंबेकर, कनिष्ठ विभागाच्या उपप्राचार्य ज्योती पालवे, किमान कौशल्य विभागाचे प्रशांत बच्छाव, कुलसचिव समाधान केदारे व महिला पक्षाचे अध्यक्ष प्रा कविता काखंडकी उपस्थित होते. शहरातील विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या श्रीमती स्वाती गुजराती, श्रीमती डॉ.निधी भन्साळी, श्रीमती सुनिता महाले, श्रीमती स्वाती मुळे, ॲड.आम्रपाली निकम, ॲड.फरिदा मिठाईवाला, डॉ. वर्षा झाल्टे, श्रीमती विनया काकडे, श्रीमती वैशाली चोरडिया, रक्षा बेदमुथा, श्रीमती राणी भंडारी, श्रीमती वैशाली वाणी, श्रीमती येणारी मॅडम उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे स्वागत गीत महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयातल्या वाणिज्य शाखेच्या प्रा.आरती छाजेड यांनी केले. तर आभार प्रदर्शन कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य ज्योती पालवे यांनी मानले.

# आमदार सुहास कांदे पुन्हा आक्रमक; पालकमंत्री भुसेंवर केले आरोप

मनमाड : शिवसेनेत फूट पडल्यानंतर नाशिक जिल्ह्यातून सर्वप्रथम नांदगाव तालुक्याचे आमदार सुहास कांदे यांनी एकनाथ शिंदे यांना पाठिंबा दर्शविला होता. महाविकास आघाडी सरकारमध्ये तत्कालीन कृषी मंत्री असलेले दादा भुसे यांनी त्यानंतर शिंदेंना पाठिंबा देत शिंदे गटात सामील झाले होते. शिवसेनेचा बालेकिल्ला असलेला नाशिक जिल्ह्यात शिवसेनेला हा जबर धक्का होता. मात्र त्यानंतर मंत्रिमंडळ घोषित झाल्यानंतर भुसे यांची नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी निवड झाली. आता शिंदे गटातील नांदगाव चे आमदार सुहास कांदे यांनीच पालकमंत्री दादा भुसे यांच्यावर आरोप केल्याने आमच्यात सर्व काही आलबेल आहे व आम्ही नाशिक जिल्ह्यात एकमुखाने काम करीत असल्याचे स्पष्टीकरण देणाऱ्या ना.भुसेंच्या वक्तव्यावर त्यांच्याच पक्षातील आमदाराने केलेल्या आरोपांमुळे राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे. महत्वाच्या बैठकांना का बोलावले जात नाही, असा सवालच सुहास कांदे यांनी दादा भुसेंना विचारल्याने नाशिकमध्ये शिंदे गटात आलबेल नसल्याचे समोर येत आहे.

दरम्यान गेल्या दीड दोन महिन्यांपासून आमदार सुहास कांदे हे



कोणत्याही कार्यक्रम, अथवा बैठकांना दिसत नसल्याची बाब माध्यम प्रतिनिधीनीं दादा भुसेंच्या निदर्शनास आणून दिली. यावेळी दादा भुसेंनी स्पष्टीकरण देताना म्हटले आहे कि, याबाबत कोणताही चुकीचा अर्थ न लावण्याची विनंती करतानाच आम्ही एक दिलाने काम करीत असल्याची ग्वाही दिली. पालकमंत्री दादा भुसे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक आयोजित केली होती. यावेळी झालेल्या पत्रकार परिषदेत भुसे यांनी कांदे यांच्या प्रश्नावर अधिक स्पष्टपणे भूमिका मांडत कोणताही गैरसमज करू नये असे सांगितले. दोन दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नाशिकमध्ये येऊन गेले. त्यावेळी कांदे या ठिकाणी उपस्थित नव्हते. याशिवाय शिंदे गटाच्या कार्यक्रमांना देखील कांदे फारसे दिसत नसल्याचे भुसेंना सांगितले.

गेल्या काही दिवसांपासून या चर्चा सरू असताना सुहास कांदे यांनी यावर पडदा टाकला असून विशेषतः याबाबत भुसेंनाच जाब विचारण्याचा सल्ला दिला आहे. कांदे म्हणाले कि, महत्त्वाच्या बैठकांना का बोलावले जात नाही, हे भुसेंना विचारावे. मात्र शिंदे गटासोबत आपण मरेपर्यंत असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. आपण नाराज नसून एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वावर आपला विश्वास असल्याचे सुहास कांदे यांनी स्पष्ट केले.

# भारतीय कम्युनिस्ट पक्ष व किसान सभाचे नेते कॉम्रेड माधवराव गायकवाड यांना स्मृतिदिनी अभिवादन

मनमाड : भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जेष्ठ नेते, स्वातंत्र्य सेनानी, संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचे नेते, खंडकरी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणारे माजी आमदार कॉम्रेड माधवराव गायकवाड यांचे १२ नोव्हेंबर २०१८ रोजी वयाच्या ९३ व्या निधन झाले. कॉम्रेड माधवराव गायकवाड यांचे कार्य शेतकरी, स्वातंत्र्य चळवळीत, खंडकरी शेतकरी प्रदिर्घ लढ्यातून जमीन मिळवून दिली आहे. सहकार क्षेत्रातही छत्रपती नाशिक जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था चे संस्थापक अध्यक्ष होते. २५ वर्ष पूर्वी स्थापन केलेल्या पथसंस्थेचे ८ शाखा कार्यरत आहेत. हौसिंग सोसाईटी उभ्या केल्या आहेत. त्यातून अनेकांना घरे मिळालेत आहेत, नांदगाव विधानसभेचे आमदार, ६ वर्ष विधानपरिषेद ,



विरोधी पक्षनेते, भाकप चे १२ वर्ष राज्य सरचिटणीस, किसान सभेचे १५ वर्ष अध्यक्ष पद भूषविले. आयटक संलग्न नगरपालिका कर्मचारी संघटना, रेल्वे युनियन, आदी चळवळीत ७५ वर्ष योगदान दिले आहे.

कॉम्रेड माधवराव गायकवाड (बाबूजी) यांचा विचाराचा वारसा व कार्य नेण्यासाठी स्वातंत्र्य सैनिक कॉम्रेड माधवराव गायकवाड, बहुउद्देशीय संस्था स्थापन करण्यात आली आहे. संस्थेच्या वतीने सामाजिक, शैक्षणिक शेती, सहकार चळवळ, कामगार क्षेत्र आदी संदर्भात उपक्रम राबविले जातात. शेतकरी-कामगार-श्रमिकांच्या चळवळीसाठी आयुष्य वेचणारे कॉम्रेड माधवराव गायकवाड (बाबुजी) ना आज १२ नोव्हेंबर स्मृतिदिनी अभिवादन करतांना शेतकरी- कष्टकरी चळवळ बळकट करून लढा देणे हीच आदरांजली ठरेल असे भाकप किसान सभा आयटक, छत्रपती नाशिक जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था संचालक कॉम्रेड राजू देसले यांनी मनोगत व्यक्त केले.

# बाळासाहेबांची शिवसेना मनमाड शहर कार्यकारणी निवडीसाठी मंगळवारी बैठक

मनमाड : मनमाड शहर बाळासाहेबांची शिवसेना व युवासेनेची शहर कार्यकारणी व पदाधिकारी यांची नियुक्ती करण्यासाठी जाहीर बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

मनमाड शहर बाळासाहेबांची शिवसेना पक्षाची मनमाड शहराची शिवसेना व युवा सेना यांची मनमाड शहर कार्यकारणी निवडण्यासाठी शिवसेना आमदार सुहास अण्णा कांदे यांचे मालेगाव नाका येथील संपर्क कार्यालयात मंगळवार दिनांक १५ नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी ११ वाजता बैठक आयोजित करण्यात आली आहे. आमदार सुहास अण्णा कांदे यांच्या सूचनेनुसार सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक होणार आहे. सर्व इच्छुक शिवसैनिकांनी बैठकीला वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन शिवसेना शहर प्रमुख मयूर बोरसे, युवासेना शहरप्रमुख योगेश इमले, आसिफ शेख यांनी केले आहे.

# नांदगाव तालुका स्तरीय क्रिकेट स्पर्धेत गुड शेफर्ड विजय



मनमाड : मनमाड येथील गुड शेफर्ड स्कूलने नांदगाव तालुका स्तरीय (१७ वर्षाआतील, मुले) क्रिकेट स्पर्धेत विजय संपादन केला. दिनांक १२ नोव्हेंबर २०२२ रोजी नांदगाव येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नांदगाव तालूक्यातील सर्व शाळेतील विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते.

अंतिम सामना न्यू इंग्लिश स्कूल नांदगाव व गुड शेफर्ड स्कूल मनमाड यांच्यामध्ये झाला व अंतिम सामन्यात गुड शेफर्ड स्कूलच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत २२ धावांनी सामना जिंकला. संघाचे नेतृत्व इयत्ता. १० वी चा खेळाडू अंशुमन सरोदे याने केले. संघाला मार्गदर्शन क्रीडा शिक्षक व्यंकटेश देशपांडे सर व रिसम परविंदर (लकी सर) यांनी केले. गुड शेफर्ड स्कूलचे प्राचार्य डॉ.क्लेमेंट नायडू, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# करंजवण पाणीपुरवठा योजनेचा लवकरच श्रीगणेशा - आमदार सुहास कांदे



मनमाड : चार दशकांपासून पाणी टंचाईचे चटके सोसणाऱ्या मनमाडकर नागरिकांसाठी, मनमाड शहरासाठी जीवनदायी असलेली ३०५ कोटी रूपये खर्चाच्या हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे बाळासाहेब ठाकरे करंजवण पाणीपुरवठा योजनेचे टेंडर अखेर मंजूर करण्यात आले असून येत्या सोमवारी टेंडर निघणार आहे. लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात येणार आहे. सदर काम ईगल कंपनीला देण्यात आले आहे. योजना अठरा महिन्यांतच पूर्ण केली जाईल असा विश्वास यावेळी आमदार कांदे यांनी व्यक्त केला.

मनमाड येथील संपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी तालुकाप्रमुख साईनाथ गिडगे, शहरप्रमुख मयुर बोरसे, सुनील हांडगे, राकेश ललवणी, स्वप्नील सांगळे, प्रसिद्धी प्रमुख निलेश व्यवहारे आदी उपस्थित होते. आमदार कांदे पुढे म्हणाले की, मनमाड शहराचा पाणीप्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून भेडसावत आहे. मात्र शहरासाठी जीवनदायी असलेली करंजवन योजना लवकरच कार्यरत होणार आहे. गेल्या तीन महिन्यांपासून अनेकदा फेर टेंडर काढूनही या योजनेची निविदा भरण्यास कंत्राटदार पुढे येत नव्हते. राज्य शासनाकडून या योजनेसाठीचा प्राथमिक हप्ताही नगरपालिकेकडे जमा झालेला असल्याची माहिती आ.कांदे यांनी यावेळी दिली. या योजनेसाठी गेल्या तीन महिन्यांत अनेक कंत्राटदार पुढे आले होते. परंतु योग्य त्या पात्रतेच्या कंत्राटदाराची तपासणी सुरू होती. अखेर अनुभवाचा निकष लावून काटेकोर तपासणीअंती या स्वरूपाच्या कामाचा दिर्घकालीन अनुभव असलेली व सुमारे १० हजार कोटी रूपयांचा टर्नओव्हर असलेल्या उल्हासनगरच्या ईगल कंपनीची निवड करण्यात आलेली आहे. येत्या सोमवार ता. १४ नोव्हेंबरला या योजनेची नगरपालिकेने दिलेली वर्कऑर्डर कार्यान्वित होईल.

या योजनेचे नाव मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरेबाळासाहेब ठाकरे करंजवण योजना असे मनमाड येथे येवून जाहीर सभेत ठेवले होते. आता योजनेचे भूमिपूजन व शुभारंभही मुख्यमंत्री शिंदे यांच्याच हस्ते पुढील महिन्यांत होईल. त्यानंतर १८ महिन्यांतच ही योजना पूर्ण होईल. गेले ४० वर्षे मनमाडकर ज्यासाठी आतूर होते त्या दररोजच्या पाणी पुरवठ्यासाठी करंजवण योजना वरदान ठरणार आहे.

याचबरोबर मनमाड एम.आय.डी. सी. साठी सध्याची जुनी पालखेड योजना हस्तांतरण केली जाणार असल्याची माहितीही आमदार कांदे यांनी यावेळी दिली. मनमाड एमआयडीसीची जागा निश्चित करून त्यासाठी या योजनेतील पाणी देण्यात येईल, त्यामुळे या मतदारसंघातील सुशिक्षित बेरोजगारांचा प्रश्न मार्गी लागण्यासही मदत होणार आहे. याचबरोबर मनमाडचे सावित्रीबाई फुले मार्केटचे तसेच महर्षी वाल्मीकी स्टेडियमचे स्ट्रक्चर ऑडिट झाले आहे. त्यांच्या दुरुस्तीसाठी प्रत्येकी ५ कोटी रूपये तर नेहरू भवनचेही काम करण्यात येणार असल्याची माहितीही आ.कांदे यांनी या पत्रकार परिषदेत दिली.

# राजस्थानी बालाजी मंदिरात महाप्रसाद कार्यक्रम संपन्न

मनमाड : सालाबादप्रमाणे येथील आठवडे बाजारातील राजस्थानी बालाजी मंदिरात अन्नकुट (महाप्रसाद) कार्यक्रम शुक्रवार दिनांक ११/११/२०२२ रोजी आयोजित करण्यात आला होता. कोविड मुळे गत दोन वर्षात निर्बंधांमुळे कार्यक्रम आयोजन करता आले नव्हते. मात्र निर्बंध शिथिल झाल्यामुळे या वर्षी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. फुलांची आकर्षक सजावट तसेच पणत्यांची आरास भाविकांची लक्ष वेधून घेत होते. दुपारी १२ वाजता राजस्थानी समाजातील ज्येष्ठ सदस्यांच्या हस्ते आरती होऊन महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न झाला.व्यंकटेश बालाजीच्या मूर्तीला ५६ भोग अर्पण करण्यात आला होता. आमदार सुहास कांदे यांनी फोन वरून कार्यक्रमास शुभेच्छा व्यक्त केल्या. ह्या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष प्रवीण नाईक, गणेश धात्रक, संतोष बळीद, फरहान खान, किरण देवरे, योगेश (बबलू) पाटील,मयूर बोरसे,महावीर ललवाणी, उमेश ललवाणी,उमेश गांधी, पप्पू परब, शैलेश सोनवणे, राजू आहेर, आदींसह समाज बांधव, बंधू भगिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन राजस्थानी बालाजी मंदिर ट्रस्ट तर्फे करण्यात आले.

# शहरातील विविध प्रश्नांसंदर्भात मुख्याधिकारी सचिन पटेल व ज्येष्ठ नागरिक संघर्ष समितीशी चर्चा

मनमाड : मनमाड शहरातील विविध प्रश्नांसंदर्भात येथील ज्येष्ठ नागरिक संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांना दिनांक ९ नोव्हेंबर रोजी नगर पालिकेचे मुख्याधिकारी व प्रशासक यांनी पाचारण करत प्रशासनाकडून शहरातील विविध प्रश्नांसंदर्भात नगर पालिकेकडून राबविण्यात येणाऱ्या उपाय योजनांची माहिती दिली.



सदर चर्चेत मुख्याधिकारी सचिन पटेल, पाणीपुरवठा अभियंता श्री.काजळे, बांधकाम विभागाचे श्री.गवळी, नगर रचनाचे अज्जू भाई शेख तसेच आरोग्य विभागाचे श्री.सोनवणे यांच्या बरोबर सविस्तर चर्चा करण्यात आली. अनियमित पाणीपुरवठा, शहरातील अतिक्रमण, वाहनांचा अडथळा, मोकाट जनावरे तसेच कोंडवाडा, नवीन स्वच्छता गृहे तसेच महिलांसाठी मध्यवर्ती ठिकाणी स्वच्छता गृहे, स्मशान भूमीतील मोकळ्या जागेत पेव्हर ब्लॉक बसविणे, आदी विविध प्रश्नांसंदर्भात नगर पालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती या वेळेस मुख्याधिकारी पटेल यांनी ज्येष्ठ नागरिक संघर्ष समितिचे अध्यक्ष राजाभाऊ पारिक, कार्याध्यक्ष नरेंद्र कांबळे एस.एम.भाले, कृष्णाजी पगारे, रामभाऊ गवळी, दिलीप आव्हाड, आर.बी. ढेंगळे, गोपीनाथ गायकवाड, श्री.देवकर यांना दिली. नगर पालिका प्रशासनाने समितीच्या पदाधिकाऱ्यांना पत्र देत चर्चेस पाचारण केल्याबद्दल समितीच्या सदस्यांनी आभार व्यक्त केले.

# पालकमंत्री दादा भुसे यांना प्रभाग क्र.१४ परिसरातील मोजणी संदर्भात निकाळेंचे निवेदन



मनमाड : मनमाड शहरात १०० वर्ष जुनी अधिकृत झोपडपट्टी वसाहत म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक प्रभाग क्र. ४ विभागाची नगरपालिकेत नोंद आहे. प्रभाग क्र.४ डॉ. आंबेडकर चौक संपूर्ण परिसर हा दलित वस्तीचा आहे. याठिकाणी निवासी अतिक्रमणे आहे. दलित प्रवर्गाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजना असतात. त्या योजनेव्दारे दलित प्रवर्गातील जीवनमान उंचवावे हा प्रमुख उद्देश असतो. या भागातील मागासवर्गिय समाजाची बऱ्याच कुटुंबाची कच्ची घरे अस्तित्वात असल्याने त्यांना पक्की घरे मिळावी म्हणून पंतप्रधान आवास योजनेव्दारे गरीबांना स्वत:च्या हक्काचे घरकुलाचे स्वप्न साकार व्हावे यासाठी ही योजना आहे. परंतु या योजनेचा लाभ घेण्यासाठी जागेचा ७/१२ उतारा असणे अनिवार्य असून त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक प्रभाग क्र. ४ विभागातील शासकीय जागेवरील निवासी अतिक्रमणे असल्यामुळे शासनाच्या पंतप्रधान आवास योजना व इतर घरकुल योजनेचा लाभ घेता येत नाही. मागासवर्गीय कुटुंबाना स्वत:चे पक्के घर मिळावे याकरीता शासन अध्यादेश दि.२७ नोव्हेंबर २०१८ क्रमांक एमयुएन-२०१८ / प्र.क्र. १९७/नवि-१८ या नुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात असलेल्या शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे कायम करून भोगवटादार वर्ग २ नुसार उतारा पट्टी लागू करण्यात यावी. या संदर्भात मी वेळोवेळी मनमाड नगरपालिका व भुमिअभिलेख कार्यालय नांदगाव यांना पत्रव्यहार करून व अमरण उपोषण व आंदोलन करून सदर प्रभागातील जागेची मोजणी करण्याकामी चलन भरण्यास भाग पाडले. मात्र भुमिअभिलेख कार्यालय नांदगाव यांचे याकामात सातत्याने दिरंगाई होत असून शासकीय काम अत्यंत संथ गतीने सुरू असून येथील रहिवाशांना भोगवटदार वर्ग २ चे उतारे मिळावे व या प्रभागातील रहिवाशांना स्वत:चे हक्काचे पक्के घराचे स्वप्न पूर्ण होणेकामी आपल्यास्तरावरून संबंधीतांना आदेशित करून कामास गती द्यावी, असे निवेदन गुरूकुमार निकाळे यांच्यातर्फे जिल्हाचे पालकमंत्री दादा भुसे यांना देण्यात आले.

# आंतरराष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत मनमाडच्या विद्यार्थ्यांचे यश



मनमाड : गुडविल गर्ल्स इंग्लिश मीडियम स्कूल येथे आंतरराष्ट्रीय ऑनलाईन बॅकस व वैदिक मॅथ स्पर्धेमध्ये मनमाडच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले. वैष्णव पायमोडे, आराध्या माहेश्वरी, अथर्व वाणी, स्वरा धर्माधिकारी, स्वरा पांडे, साईशा गायवले, अर्णव तीवलेकर, आदिती बाविस्कर, कृष्णा पालखेडे, काजवी वाडकर, स्नेहा घरटे, अन्वी भूधर, प्राची जगताप, अभंग जोशी, अभीर गुरव, आयुष सोनवणे, यक्षित गवांदे, खदीजा खान, जान्हवी आहेर, मुस्कान टेंभारे, अद्विता हाके, वरद वनवे, वीर छाबरिया, कुणाल जगदाळे, साची जाधव, ज्ञानेश्वरी मोकळ, तनिष्का आव्हाड, अद्विता महाजन, त्रिशा पवार, आरुष राय, अंतरा कोठावदे, स्पर्श बागुल, श्रेया बंदावणे, लावण्या पाटील, साईशा माने, सईश्री माने, अनुज देव, जिज्ञासा मोरे, तनुश्री नाईक, वंश छाबरिया, दर्शिता छाबरिया, समृद्धी जेजुरकर, रत्नेश पगारे, संजना पांडे, सिद्धार्थ मोकळ, योगेश्वरी घटे, या विद्यार्थ्यांनी विनर, प्रथम द्वितीय तृतीय पारितोषिक मिळवले. सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पारितोषिक देण्यात आले. शाळेचे संस्थापक श्री ड. शशिकांत काखंडकी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. शिक्षिका सौ. वृषाली पांडे व सौ हर्षा मोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेत पुणे जिल्हा संघ विजय



मनमाड : महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मनमाड येथे नुकत्याच संपन्न झालेल्या आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेत पुणे जिल्हा हा संघ विजयाचा मानकरी ठरला. द्वितीय क्रमांक अहमदनगर जिल्हा व, तृतीय क्रमांक पुणे शहरी विभाग तर चतुर्थ क्रमांक नाशिक कबड्डी संघाने मिळवला. या कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ सहाय्यक संचालक डॉ.दत्ता महाधम, प्राचार्य अरूण पाटील, निवड समिती अध्यक्ष दत्ता शिंदे, निवड समिती सदस्य प्रा.कॅप्टन रावसाहेब गरड, प्रा. शांताराम ढमाले, शारीरिक शिक्षण अभ्यास मंडळ अध्यक्ष डॉ. सुरेखा तमरे, डॉ.दिनेश कराड, स्पर्धा संयोजन सचिव प्रा.संतोष जाधव, प्रा.महेंद्र वानखेडे, प्रशांत सानप, पवनसिंग परदेशी, लेफ्टनंट प्रकाश बर्डे, रोहन बागुल, राष्ट्रीय पंच सतीश सूर्यवंशी व पंच उपस्थित होते.

BIS 100% Hall Marked Jewellery

आमच्याकडे कोणतेही BIS प्रमाणित ९१६ हॉलमार्क दागिने मोडताना घट येत नाही.

**कोणत्याही आणि कोणाच्याही भूलथापांना बळी पडू नका.**

✲ हॉलमार्क नसलेले दागिने खरेदी करणे नुकसानदायक आहे.
✲ हॉलमार्क नसलेले दागिने खरेदी केल्यामुळे सोन्याच्या शुध्दतेत फसवणुक होऊ शकते.
✲ 916 22 K हॉलमार्क दागिने KDM2-LOY पासून बनलेले असतात त्यांना डाग नावाचा प्रकार नसतो.
✲ फक्त 916 22 K मार्किंग म्हणजे हॉलमार्क नसतो. त्यावर BIS चा लोगो सुध्दा असला तरच तो दागिना ओरिजनल हॉलमार्क असतो.
✲ BIS हॉलमार्क दागिने खरेदी करण्याचे फायदे.
✲ हॉलमार्क असलेले दागिने खरेदी केल्यामुळे सोन्याच्या शुध्दतेत फसवणूक होत नाही.
✲ भारत सरकार प्रमाणित लॅबमध्ये दागिन्यांची पारख होते व दागिना शुध्द असेल तरच त्याच्यावर हॉलमार्किंग केली जाते.
✲ BIS 916 22 K हॉलमार्क दागिने मोडतांना कसलीही डागाची घट कापली जात नाही.
✲ हॉलमार्क सोन्याच्या दागिन्यांना मजुरी ही प्रती ग्रॅममागे लागते. ती ही कॅरेट च्या योग्य भाव प्रमाणे. आणि तीच आधी समजावून घ्या. शंका असल्यास आम्हाला संपर्क करा.
✲ २० कॅरेट, २२ कॅरेट हॉलमार्क सोन्याचे भाव आणि २३ कॅरेट, २४ कॅरेटसोन्याचे भाव हे हे वेगवेगळे असतात.
✲ नवीन हॉलमार्क सक्तीचे कायदे हे ग्राहक हितासाठीच बनलेले आहेत.
✲ साध्या (estimate, qotation लिहिलेले) पावतीवर व्यवहार केल्यास तुमची फसवणूक अटळ आहे. GST चे पक्के बिल मागून घ्या.
✲ दागिने खरेदी खरेदी केल्यावर GST चे पक्के बिल मागून घ्या आणि ते मिळत नसेल तर तेथून दागिने खरेदी करू नका. अन्यथा तुम्ही फसवले जाऊ शकता.
✲ तुमचे याआधी खरेदी केलेले दागीने सुध्दा योग्य भावाप्रमाणे मोडले जाऊ शकतात ते मोडता येणार नाही. घट जास्त येईल. कमी भाव मिळेल हा अपप्रचार केला जात आहे.
✲ जुने दागिने हॉलमार्कचे नसतील तरीही त्यांची किंमत कमी होत नाही हे लक्षात ठेवा.
✲ रोजचे सोने-चांदीचे भाव जाणून घेण्यासाठी आम्हास संपर्क करा.



**कंचन ज्वेलर्स**

४५७, सराफ बाजार, मनमाड

दिपक गोयल
सचिव : सराफ सुवर्णकार असो. मनमाड
सरचिटणीस : भाजपा मनमाड शहर
मो.9960931414


बाळासाहेबांची शिवसेना महिला आघाडी
शिवसेना
जिल्हा, तालुका व शहर नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे
हार्दिक अभिनंदन
मंगलाताई भास्कर जिल्हाप्रमुख
विद्याताई जगताप नांदगाव ता.प्रमुख
संगिताताई बागुल मनमाड शहरप्रमुख
सौ.रोहीणी मोरे नांदगाव शहरप्रमुख
सौ.पुजा छाजेड विधानसभा संघटक
ॲड.श्रद्धा कुलकर्णी उप जिल्हाप्रमुख
सौ.उज्वलाताई खाडे (माया मावशी) उप जिल्हाप्रमुख
सौ.कल्पनाताई दोंदे उप जिल्हाप्रमुख
नाजमा मिर्झा उप ता.प्रमुख
सरला घोगळे उप ता.प्रमुख
सौ.कविताताई पाटेकर उप शहरप्रमुख
सौ.सुरेखा ढाके उप शहरप्रमुख
सौ.लक्ष्मीताई आहिरे शहर समन्वयक
सौ.नेहा जगताप शहर समन्वयक
सौ.नीता लोंढे उप शहर संघटक
सौ.संगिता घोडेराव उप शहर संघटक
सौ.प्रतिभा अहिरे उप शहर संघटक
सौ.संगिता सांगळे उप शहर संघटक
सौ.राधा मोरे उप शहर संघटक
सौ.वंदना शिंदे उप शहर संघटक
सौ.भावना गंगावणे उप शहर संघटक
सौ.सावित्री खुरसणे उप शहर संघटक
सौ.नीता परदेशी उप शहर संघटक
सौ.अलका कुमावत उप शहर संघटक
सौ.भारती बागोरे शहर समन्वयक
तब्बसुम सैय्यद उप शहरप्रमुख
सौ.उषा पगारे शहर समन्वयक
सौ.पल्लवी सोमासे शहर संघटक
सौ.शेवंताबाई राठोड जातेगाव गटप्रमुख
सौ.ललिता राठोड जातेगाव गणप्रमुख
सौ.गंगाबाई चव्हाण
सौ.सुमन राठोड
सौ.दाकीबाई जाधव
सौ.विमल चव्हाण
सौ.गीता पवार न्यायडोंगरी गटप्रमुख
सौ.अश्विनी पवार साकोरा गटप्रमुख
सौ.कविता ताडगे साकोरा गणप्रमुख
सौ.सुनिता महाले भालूर गटप्रमुख
सौ.अर्चना सोनवणे भालूर गणप्रमुख
सौ.मनिषा महाले
सौ.आशा पगारे
सौ.सिमा जाधव कळवाडी गटप्रमुख
सौ.मालती वाघ कळवाडी गणप्रमुख
सौ.सोनाली सुर्यवंशी
सौ.मनिषा इंगळे निमगाव गटप्रमुख
सौ.भारती ठोके निमगाव गणप्रमुख
सौ.दिपाली शिल्लक
सौ.मोहीणी लटके
सौ.सोनाली तोरे
जिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख व शहरप्रमुख यांच्या अधिपत्याखाली उर्वरीत नियुक्त्या लवकरच जाहीर करण्यात येतील
शुभेच्छुक: तमाम शिवसैनिक, युवासैनिक, महिला आघाडी, शिवसेना अंगिकृत संघटना पदाधिकारी, आजी माजी लोकप्रतिनीधी शिवसेना नांदगांव मतदार संघ


आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक व मित्र परिवारास
'विजयादशमी व दिपावलीच्या' हार्दिक शुभेच्छा !
यंदाची दिवाळी 'कंचन' सोबतच...
दसरा-दिवाळी
धमाका ऑफर
सोने-चांदी दागिने खरेदी
सोबतच आकर्षक
बक्षिसांची लयलुट...
रु.3000 च्या पुढील खरेदीवर मिळवा मोफत कुपन आणि
लकी ड्रॉ द्वारे आकर्षक बक्षिसे जिंकण्याची सुवर्णसंधी...!
प्रथम बक्षिस
XIAOMI (40inch)
अँनरॉईड LED टि.व्ही.
द्वितीय बक्षिस
Vivo (6/128GB)
मोबाईल फोन
तृतीय बक्षिस
Whirlpool (190ltr.)
फ्रिज
चतुर्थ बक्षिस
XIAOMI (32 inch)
अँनरॉईड LED टि.व्ही.
पाचवे बक्षिस
LG (7Kg.)
वॉशिंग मशिन
सहावे बक्षिस
Crompton (550w)
मिक्सर - ५ नग
सातवे बक्षिस
Noise (1.69" Display)
स्मार्ट वॉच- ५ नग
आठवे बक्षिस
Cello (18 pcs.)
किचन सेट - ५ नग
नववे बक्षिस
Boat Rockerz
हेडफोन्स - ५ नग
दहावे बक्षिस
Esquire Palstic
टि-टेबल - ५ नग
अकरावे बक्षिस
लगेज ट्रॉली बॅग
५० नग
मग विचार कसला...यंदा सणानिमित्त संधी आहे...
खरेदीची आणि लकी ड्रॉ द्वारे बक्षिसे जिंकण्याची...
* हॉलमार्क दागिने
* कोणतेही छुपे कर नाही
* पारदर्शक व्यवहार
* योग्य भाव व मजुरी
शुध्दता आणि विश्वासाची वैभवशाली परंपरा
कंचन ज्वेलर्स
सराफ बाजार, मनमाड, मो.९४२१५०५१२२, ९९६०९३१४१४